# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 204/2022 दिनांक : 19.05.2022**

## 1)घरफोडी :–

**1)भोकर :–** दिनांक 15.05.2022 रोजी चे 14.00 ते दि. 17.05.2022 चे 14.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी अमीन नगर किनवट रोड भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे चॅनलगेट चे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी कपाट तोडुन कपाटातील सोन्याचे दागीने व नगदी रुपये असा एकुण 3,15,000/– रुपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अब्दुल खादर अब्दुल हमीद, वय 62 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. अमीन नगर किनवट रोड भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 171/2022 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री अनिल कांबळे, मो.क्र. 9096254358** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 17.05.2022 रोजी चे 23.00 ते दि. 18.05.2022 चे 05.00 वा. चे दरम्यान, **मुंजाजी नगर नांदेड येथील फिर्यादीचे भावाचे घरी, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे भाऊ नामे काझी अहेसान अजिज सिद्दिकी यांचे राहते घराचे कुलूप कोंडा तोडुन घरातील बेडरुम मधील कपाटातील डेल व कंपॅक्ट कंपनीचे असे दोन लॅपटॉप किंमत अंदाजे 15,000/– रुपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अॅड शेहजान म. जुल्फेखारोदिन सिद्दिकी, वय 46 वर्षे, व्यवसाय वकीली रा. शिवराय नगर तरोडा खु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 173/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/81 बंडेवार, मो.क्र. 9923103778** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**मरखेल :–** दिनांक 17.05.2022 रोजी चे 22.00 ते दि. 18.05.2022 चे 06.00 वा. चे दरम्यान, **मौजे हाळी शिवार ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील सतीश शंकरराव जाधव यांचे शेत गट क्रं. 235 मधील तार नसलेले उभे असलेले सिमेंटचे दोन पोल किंमत अंदाजे 2000/– रुपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी संग्राम गंगाधर पांढरे, वय 29 वर्षे, व्यवसाय वरिष्ट तंत्रज्ञ एम.एस.बी.एस. करडखेड ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 84/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2505 प्रभाकर कदम, मो.क्र. 9923606729** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**1)सिंदखेड :–**दिनांक 15.05.2022 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **मौजे अंजनखेड फिर्यादीचे शेतात ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी हा शेतात गेला असताना त्याचे शेताचे शेजारी भिमराव लक्ष्मण भगत यांचे शेतातील गोठयास आग लागल्याने धुर निघत असल्याने फिर्यादी यांनी फोन करुन माहिती दिली असता आरोपीतांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन हातातील गोटयाने डोक्यात मारुन गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी महेश्वर लक्ष्मण भगत वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. अंजनखेड ता. माहुर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरन 64/2022 कलम 326,504,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/2356 डी.जी. चव्हाण, मो. नं. 7350860891** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–**दिनांक 17.05.2022 रोजी चे 23.00 वा. ते 00.00 वा. चे दरम्यान, **समतानगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीस तुझ्या घरात माझा मोबाईल आहे तो द्या असे म्हणाल्याने फिर्यादीने त्यास तुझा मोबाईल माझे घरात नाही असे म्हणाल्याने आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करुन हातातील विटीने फिर्यादीचे कपाळावर नाकावर मारुन गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शिवाजी माधवराव वाघमारे वय 42 वर्षे, व्यवसाय मिस्त्री रा. समतानगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 174/2022 कलम 326,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री प्रशांत जाधव, मो. नं. 9823603909** हे करीत आहेत.

**3)कंधार :–**दिनांक 18.05.2022 रोजी चे 13.00 वा. सुमारास, **संत नामदेव महाराज मंगल कार्यालय समोरील सिमेंट रोडवर कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस लग्नसोहळयासाठी माझा अॅटो भाडयाने गावातुन कंधार येथे येण्यासाठी का लावला नाहीस असे म्हणुन शिवीगाळ करुन हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीचे हाताच्या कोपऱ्यावर मारुन गंभीर दुखापत केली व खाली पाडुन लाथा बुक्याने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी लक्ष्मण दशरथ शेळके वय 31 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गुलाबवाडी ता. कंधार जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 155/2022 कलम 326,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोउपनि/श्री गणाचार्य, मो. नं. 8823391570** हे करीत आहेत.

## 4)अपघात :—

**हदगाव :—** दिनांक 16.05.2022 रोजी 10.30 वा. चे सुमारास, **यळंब फाटा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे ओमकार भारत वानखेडे वय 21 वर्षे, व्यवसाय शेती रा. रुई ता. हदगाव जि. नांदेड** हा बहिणीचे लग्नाची पत्रिका घेऊन मावशीचे घरी आपली मो. सा. क्रं. एमएच–26/बीटी–9152 हिचेवर जात असताना यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील बोलेरो पिकअप क्रं. एमएच–26/ई–0408 ही हयगय व निष्काळजीपणे चालवुन मयत यास जोराची धडक दिल्यामुळे गंभीर जखमी करुन त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी सतीश भारत वानखेडे, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती रा. रुई ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं. 157/2022 कलम 279,304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री चोपडे, मो.क्र. 7972432049** हे करीत आहेत.

## 5)विश्वासघात :—

**विमानतळ :—** दिनांक 18.05.2022 रोजीचे 08.30 वा. चे सुमारास, **नमस्कार चौकाजवळ गोदावरी सूपरमार्केट जवळ नांदेड येथे,** यातील नमुद अनोळखी वाहन चालक हा स्पेंलडर मो. सा. वर येवून फिर्यादी जवळ येवून मावशी बरे आहात काय असे बोलून विश्वासात घेवून तूमच्या एल.आय.सी. मध्ये काम करणाऱ्या मुलास एक ज्युपीटर स्कुटी ज्याची किंमत एक लाख दहा हजार रुपये व दीड तोळयाचे नेकलेसची लॉटरी लागली आहे असे भासवून सदरचे लॉटरीचे बक्षीस घेण्याकरीता तूमच्या अंगावरील सोन्याचे दागीन्याचे वजन केल्या शिवाय लॉटरीचे बक्षीस देता येणार नाही असे भावनीक बोलुन सोन्याचे दागीने वजन करुन पावती तयार करुन तुम्हाला परत देतो असे म्हणुन सोन्याचे दागीने घेवून मला परत न देता चोरुन नेवून माझा विश्वासघात केला. वगैरे **फिर्यादी सखूबाई व्यंकटराव देवकांबळे वय 55 वर्षे, रा. पांडुरंगनगर नमस्कार चौक नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 179/2022 कलम 406,419 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बिरकुले मो.नं. 9623652730** हे करीत आहेत.

## 6)जुगार :—

**1)वजिराबाद :—** दिनांक 18.05.2022 रोजी चे 15.50 वा. चे सुमारास, **खडकपुरा, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 7320/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2085 विजयकुमार कुरमया नंदे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 166/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1007 झांबरे, मो.क्र. 8975992449** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :—** दिनांक 18.05.2022 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **साजने हॉस्पीटल समोर सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1260/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2896 शेख इम्रान शेख एजाज, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 167/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/419 डवरे, मो.क्र. 8975992258** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :—

**1)देगलुर :—** दिनांक 18.05.2022 रोजी चे 13.15 वा. चे सुमारास, **नविन सराफा ॲक्सीस बॅके च्या बाजुला सार्वजनिक रोडवर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 2400/–रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/580 कुष्णा गंगाराम तलवारे, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 241/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1636 मिरदोडे, मो.क्र. 9821159844** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :—** दिनांक 18.05.2022 रोजी चे 19.15 वा. चे सुमारास, **कोटतिर्थ ते सुगाव रोडचे बाजुला आरोपीचे घराचे पाठीमागे कोटीतीर्थ शिवार ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1440/–रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोका/95 मुंजाजी अशोकराव चौरे, ने. पोस्टे लिंबगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 87/2022 कलम 65(ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री जहागीरदार मो.क्र. 9822337382** हे करीत आहेत.

## 8)भारतीय हत्यार कायदा :—

**विमानतळ :—** दिनांक 18.05.2022 रोजी चे 17.45 वा. चे सुमारास, **क्लासीक हेअर सलुनचे समोर सार्वजनिक रोडवर माळटेकडी, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशीर रित्या एक खंजर ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1211 बंडु केशवराव कलंदर, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 181/2022 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1986 कानगुले, मो.क्र. 9657707486** हे करीत आहेत.

## 9)विद्युत शॉक लागुन मृत्यु :—

**लोहा :—**दिनांक 18.05.2022 रोजी चे 13.40 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे तरबेज शेख माजिद अगवान, वय 22 वर्षे, रा. आमगपव बुथ ता. साकोली जि. भंडारा जि. नांदेड**, हा लाईटचा पोल बदलण्याचे काम करीत असतांना अचानक सर्विसिंग वायर मध्ये करंट रिटर्न आले येवुन मयताचे हाताला विजेचा शॉक लागुन बेशुध्द पडल्याने उपचार कामी सरकारी दवाखाना लोहा येथे दाखल केले असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **खबर देणार ओमकार शरद नरोटे, वय 28 वर्षे, व्यवसाय गुत्तेदार रा. कासावाडी ता. चिपळुन जि. रत्नागीरी** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे लोहा** आ. मृ. 15/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोह/408 केंद्रे, मो.नं. 9730726378** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड